# प्रकरण तिसरे

## कथात्मक साहित्यातील व्यक्तिरेखा

# प्रकरण तिसरे

## कथात्मक साहित्यातील व्यक्तिरेखा

हमीद दलवाईंच्या कथात्मक साहित्यात सामाजिकतेचे कोणकोणते विशेष पहावयास मिळतात, त्याचा विचार गेल्या प्रकरणात आपण केला. या प्रकरणात हमीद दलवाईंच्या कथात्मक साहित्यातील व्यक्तिरेखांचा विचार करणे अभिप्रेत आहे.

हमीद दलवाईंनी आपल्या कथात्मक साहित्यात समाजपातळीवरील विषयांना जेवढे महत्त्व दिलेले आहे, तेवढेच महत्त्व समाजातील व्यक्ती या घटकाला दिले आहे. त्यांनी कथात्मक साहित्यातील समाजचित्रण जसे वास्तव पातळीवर ठेवलेले आहे, तसेच व्यक्तिचित्रणही वास्तव पातळीवर ठेवण्यात हमीद दलवाई यशस्वी झालेले आहेत. त्यांच्या व्यक्तिरेखा या जिवंत हाडामासाच्या व्यक्तीसारख्या वाटतात.

त्यांच्या व्यक्तिरेखा विशेषकरून कोकणातील हिंदू व मुसलमान समाजातील आहेत. या समाजातील विविध स्वभावाच्या व्यक्ती त्यांनी आपल्या साहित्यात रेखाटलेल्या आहेत.

या प्रकरणात ज्या व्यक्तिरेखांच्यामध्ये जवळजवळ सारखी वैशिष्टये आढळतात, अशा व्यक्तींचा विचार एकत्रपणे केला आहे व ज्या व्यक्तिरेखा कोणत्याही एका गटात विभागता येत नाहीत त्यांचा स्वतंत्रपणे विचार केलेला आहे.

१) "इंधन"चा निवेदक:

"इंधन" या कादंबरीतील प्रमुख व्यक्तिरेखा म्हणजे या कादंबरीचा निवेदक होय.

निवेदकाने पंधरा वर्षांपूर्वी घर सोडले होते. तो मुंबईला नोकरीला कामाला असतो. तेथे त्याला हृदयविकाराचा झटका आला होता. थोडे दिवस औषधोपचार घेतल्यानंतर डॉक्टरांच्या सल्ल्याने दीर्घकाळ विश्रांती घेण्यासाठी तो गावी येतो.

निवेदक मुसलमान आहे. परंतु पंधरा वर्षांपूर्वी इस्लामच्या पुनरुत्थानाच्या सा-या मुसलमान समाजाला भारून टाकणा-या भावनेने त्याच्या मनाला कधीच स्पर्श केला नाही. उलट निवेदक म्हणतो, "मी राष्ट्रसेवा दलात जात होतो आणि डोकीवर गांधी टोपी घालीत होतो. त्याकाळी गांधी टोपी घालणे हेच इस्लामच्या गद्दारीचे लक्षण मानले जात होते." १

निवेदक नास्तिक आहे. गावातील मुसलमान समाजाला हे माहीत आहे. निवेदक घेतुनच्या मूठमातीला जात नाही. तेव्हा लोक त्याला मरतिकाची नमाज पढायची नव्हती म्हणून आला नाही अशी चर्चा करतात. निवेदक जुम्माच्या नमाजाला जात नाही. इसाक न येण्याचे कारण विचारतो तेव्हा तो इसाकला मी नमाज पढत नाही असे स्पष्टपणे सांगतो.

निवेदकाबरोबर पूर्वी मुसलमान समाज फटकून वागत होता. आता देखील तसाच वागेल असे त्याचे मत आहे. पंधरा वर्षांपूर्वी त्याने मुसलमान समाजाचा रोष पत्करून कुळवाड्याच्या जमिनी परत मिळवून दिल्या होत्या. हे मुसलमान समाज अजूनही विसरला नव्हता. त्यामुळे त्यांच्याशी वागताना पूर्वी अशी परकेपणाची भावना होती तशीच आता देखील आहे.

निवेदकाला आपण सामान्य माणूस आहोत याची जाणीव आहे. म्हणून गांधीजींच्या उपोषण, सत्याग्रह या मार्गांचा गावातील संघर्षाच्या संदर्भात अवलंब करणे उपयोगाचे ठरणार नाही याची त्याला जाणीव आहे. तसा तो गावात उपराच असतो. गावातील लोकांना त्याचे विचार पटत नाहीत आणि त्याचा सल्लाही कोणी मानीत नाहीत. निवेदक म्हणतो, "गेल्या पंधरा वर्षांत बरेच बदललेले होते. अनेक बरेवाईट त्या काळाच्या झंझावातात कोसळून पडले होते. काही चांगले आणि वाईटही पडले होते आणि त्या दोन्हीना मी भीत होतो. "स्टेटस् को"चा पक्ष घेऊन बसलो होतो. एक प्रकारचा डबलरोल आपण चालवला आहे असे मला वाटू लागले."[२] निवेदकाचे हे आत्मपरीक्षण महत्त्वाचे आहे. आपण फक्त विचारानी पुढे गेलो आहोत आचाराने मात्र पाठीमागे आहोत याची जाणीव निवेदकाला आहे. त्यामुळे आपण गावात राहण्याला किंवा मुंबईला निघून जाण्याला काहीही महत्त्व नाही असे वाटते.

निवेदकाने गावातील संघर्षामध्ये मानवी उपायाची सामर्थ्यहीनता लक्षात घेतलेली आहे. भाभी गावात खलबता चालू आहेत असे जेव्हा म्हणाते तेव्हा तो म्हणतो, "काय खलबता करणार ? हीच वाचे वाजवल्यास हरकत घ्यायची. कोर्टात जायचं. उरूस बंद करायाचो. हायत त्यो कटकटी वाढवायच्यो. काही दिवस ही ऐसांच चालेल, मग अपसुख सगले ताल्यावर येतील."[3] समाजामध्ये संघर्ष निर्माण झाला तरी काही दिवस वातावरण तंग राहील माणसाला सुरळीत जीवनाची आवश्यकता आहे. त्यामुळे काही दिवसानंतर गावातील संघर्ष मिटेल असा निवेदकाचा विश्वास आहे.

गावातील संघर्षाविषयीचे त्याचे निदान अचूक आहे. गावातील संघर्ष निर्माण झाल्यानंतर समझोत्याच्या बैठकीत सुमतीचा चुलत भाऊ निवेदकाजवळ हा संघर्ष पुन्हा पेटू नये म्हणून हमी मागतो. त्यावेळी निवेदक म्हणतो,

"त्याची हमी मी कशी देणार ? मी कायमचा इथे थोडाच राहणार आहे ? माझ्या हमीचा काही उपयोगही नाही, शिवाय असं होणारच नाही याची कुणी कशी खात्री देईल ? अखेर आपण माणसंच आहोत.. मनुष्य आहे तेथे भांडण तंटा असायचाच. तो आपण सलोख्याने मिटवायचा."[४] निवेदकाचे हे स्पष्टीकरण मानवी संघर्षाचे मूळ त्याचे अटळत्व जाणणारे आहे.

गावातील संघर्षात तो कोणत्याही गटाची बाजू घेत नाही. तो संघर्षाकडे अलिप्तपणे पहातो. त्यामुळे दोन्ही गटातील माणसांचा त्याच्यावर विश्वास असत नाही. सर्व समाजाकडून त्याची अवहेलनाच होते. समाजपातळीवरील असा समाजकार्यकर्ता बांडोटाच ठरतो.

सतत आत्मपरीक्षण करणाऱ्या निवेदकाने दुसऱ्याच्या व्यक्तिमत्वातील वैगुण्याबरोबरच स्वतःच्या वैगुण्यावर बोट ठेवले आहे. भावाच्या व्यभिचाराबद्दल त्रागा करणारा निवेदक म्हणतो, "आणि माझ्या त्राग्याला अर्थ तरी कुठे उरला आहे ? मी तरी कसा वागलो आहे ? पक्षातील त्या पिंगट डोळ्यांच्या मुलीचा एकदा मला लोभ जडला नव्हता का ? ती अनैतिक वागत असल्याचे माहीत असूनही तिला पक्षातून काढून टाकायला मीच विरोध केला. प्रखर विरोध. माझ्या तोंडावर कुणी काही बोलले नाही, परंतु मागून माझ्या विरोधाचा अन्वयार्थ काढण्यात आलाच असेल ! काय म्हणालो होतो मी तेव्हा ? अशी अनेक माणसे बरोबर घेऊनच आपल्याला पुढे जायला हवे. सर्वसमावेशक बनायला हवे .... चार माणसे एकत्र आल्यानंतर बऱ्या वाईटांचे मिश्रण होणारच. सारा समाजच सुधारला पाहिजे."[५] यातून त्याचा निखळ प्रामाणिकपणा जाणवतो.

निवेदकाचे व्यक्तिमत्व संवेदनशील आहे. सुमतीचे दुःख ऐकून त्याच्या मनावर मार्फियासारखा परिणाम होतो. गावच्या संघर्षानंतर चार दिवस तो आजारी पडतो.

गावात विश्रांती घेण्यासाठी आलेला निवेदक संघर्षानंतर पुन्हा मुंबईला निघून जातो.

थोडक्यात, "इंधन" या कादंबरीतील निवेदक गावातील संघर्षाकडे अलिप्तपणे पहातो. दुस-याच्या वैगुण्याबरोबर स्वत:ची वैगुण्ये सांगतो. गावातील संघर्षाचे अटळत्व जाणणारा हा निवेदक संवेदनाशील मनाचा आहे. निवेदकाचा स्वभाव सर्व घटनाकडे नि:पक्षपातीपणाने बघण्याचा आहे. घटनांचे तो यथायोग्यपणे आकलन करतो व वस्तुनिष्ठपणे त्या घटनांचा अर्थ लावतो. आपला त्यावरील अभिप्राय प्रकट करतो. निवेदकाचा स्वभाव समंजस, नि:पक्षपाती असल्यामुळे तो या कादंबरीतील एक पात्र असूनही निवेदन करणा-या लेखकाची भूमिकाही उत्तम प्रकारे वठवतो. लेखकाने निवेदकाचे हे व्यक्तिवैशिष्टये सहेतूकपणे चित्रित केले आहे व कलात्मक बनवले आहे याचा प्रत्यय येतो.

२) <u>कष्टीपण प्रेमळ भाऊ :</u>

निवेदकाच्या माघारी कुटुंबाची सर्व जबाबदारी भाऊ पार पाडतो. निवेदक मुंबईहून गावी येतो त्यावेळी त्याला भावामध्ये बराच बदल जाणवतो. भाऊ घरच्या जबाबदारीने खंगलेला होता. गेलेल्या पंधरा वर्षाच्या काळाचे ओरखडे भावाच्या संबंध शरीरावर उमटलेले जाणवतात. भाऊ जेव्हा हसतो तेव्हा निवेदकाला त्याच्या गळ्याचे वरती आलेले हाड वरखाली हललेले दिसते. निवेदक दु:खी होतो. आपण घरच्या जबाबदारीचे ओझे झटकून दिल्यामुळेच भावाची ही अवस्था झाली होती असे त्याला वाटते. निवेदक म्हणतो, "थुकार बैलाबरोबर गाडी ओढणा-या बैलासारखी त्याची अवस्था झाली होती. जणू खांदा आलेल्या अवस्थेतही तो निमूटपणे मान खाली घालून गाडी ओढत होता ।" ६

भावाचे आणि सुमतीचे प्रेमसंबंध होते. भाऊ पूर्वी मास्तरकी करीत असताना विद्यार्थीदशेत असणाऱ्या सुमतीवर त्याने बलात्कार केलेला असतो. सुमती त्याच्यामुळेच जीवनातील सर्वस्व गमावून बसली होती. तेव्हापासून ती त्याची दीन बनून राहिली होती.

निवेदकाचे सुमतीच्या घरी येणे - जाणे सुरू होते. त्यावरून भाऊ व निवेदक यांच्यामध्ये कौटुंबिक भांडण होते. भाऊ जबाबदारी टाकून पंधरा वर्षे बाहेर गेल्याने मला विचारायला लाज वाटायला पाहिजे असे म्हणतो. भांडणाच्यावेळी मध्यस्थी करणारी भाभी तुम्ही वडील आहात. घर सांभाळण्याची जबाबदारी तुमची आहे असे जेव्हा म्हणते त्यावेळी दोन्ही हात पुढे करून "ह्या जबाबदारींनी माजी ही दशा झाली. मनाची माती झाली. ह्यो बाजीराव तंवा कुठे होतो ? काय करत होतो ? राजकारण पुढारपन, तंवा याच्या पायात कुनी बेड्यो घतल्यो ?" ७ असे म्हणून पंधरा वर्षे बेकार जीवन घालवल्याची चूक त्याला सांगतो.

भाऊ हट्टी स्वभावाचा होता. कुळवाड्यांनी गवतात गुरे घातल्यामुळे भाऊ कुळवाड्याबरोबर संघर्ष करतो. निवेदकाचा सल्ला झुगारून त्यांच्यावर खटला भरून त्यांना माफी मागायला लावतो. त्याच्या या हट्टी स्वभावामुळेच घरातील कोणाचाही सबुरीचा सल्ला त्याला पटत नाही. साहजिकच कुळवाड्यांना व बौध्दांना जेरीस आणण्याची भाषा बोलणारा इसाक त्याला अधिक जवळचा वाटतो. गावातील संघर्षात इसाकने बोलविलेल्या मुसलमानांच्या बैठकाना भाऊ हजर राहतो. इतकेच नव्हे तर संघर्ष झाल्यानंतर निवेदक मुंबईला जायला निघतो. त्याच्या आदल्या रात्री तो इसाकलाही घरी जेवायला बोलवतो.

भाऊ हट्टी आहे पण तितकाच प्रेमळ आहे. निवेदक भाऊ भांडणानंतर आजारी निवेदकाला तो मुद्दामहून बोलवतो. व त्याच्या आजाराची

चौकशी करतो. निवेदक जाण्याच्या आदल्या रात्री कोंबडीची बिर्याणी करतो. दुसऱ्या दिवशी निवेदकाला घालविण्यासाठी तो स्टँडवर जातो. तिथे तो बस सुटेपर्यंत थांबतो.

निवेदकाचा भाऊ घरची जबाबदारी निमूटपणे सांभाळतो. रागाच्या वेळी भावाबरोबर भांडतो. राग शांत झाल्यानंतर पुन्हा त्याच्याबरोबर मुद्दामहून बोलतो. असा हा प्रेमळ भाऊ तितकाच हट्टी आहे. कुळवाड्या-बरोबरच्या भांडणात त्यांना माफी मागायला लावतो.

लेखकाने भावाच्या गुणाबरोबरच दुर्गुण कादंबरीत चित्रित केल्यामुळे भावाची व्यक्तिरेखा अधिक जिवंत व वास्तव वाटते.

३) <u>कुटुंबावर प्रेम करणारी श्रद्धाळू भाभी:</u>

निवेदकाच्या कुटुंबातील समजूतदार, प्रेमळ व कुटुंबातील सर्वांच्याबद्दल आदर असणारी भाभी कादंबरी वाचून वाचकांच्या मन:पटावर कायम रेंगाळत रहाते.

भाभीला दिराबद्दल भावविवशतेचा स्पर्श न झालेले कणखर निरागस प्रेम आहे. निवेदक बऱ्याच दिवसांनंतर घरी येताच आश्चर्यचकित झालेली भाभी निवेदकाला म्हणते, "आनी कळवलंय नाय ? बेग हातात घेऊन चालत अयलाव. कोन अयलां नसतां ?" [8] निवेदक आल्यानंतर सर्व घर शेणाने सारवून स्वच्छ करते. आपल्या दिराला ती दरवर्षी मोहरमचा मलिदा पाठवायची. निवेदक आजारी पडला आहे हे कळताच ती गावातील माणसाबरोबर घरी यायचा निरोप पाठवते. निवेदकाला घराकडून जी भावाची व बाबाची पत्रे येत त्यातील आशय हा भाभीचा असायचा. निवेदक मुंबईला जायला निघतो. त्यावेळी निम्म्या वाटेपर्यंत पोचवायला जाते. नवरा रागावून माघारी

जाण्यास सांगतो तेव्हा पत्र लिहा व पुन्हा घरी या असे म्हणून दिराचा निरोप घेते.

भावीला मूल नव्हते. तरीही ती दु:खी होत नाही. निवेदकाला भावाच्या शरीरामध्ये फरक जाणवतो पण भीवी लग्न झाल्यावर जशी होती तशीच दिसते.

भावी बऱ्यावाईट अनुभवाचे गाठोडे वाहत या घराशी समरस झालेली होती. पारंपरिक स्त्रीप्रमाणे पति-पत्नी मध्ये असणाऱ्या सीमारेषेचे ती कधीही उल्लंघन करीत नाही. आपला नवरा व सुमतीचे प्रेमसंबंध आहेत हे माहीत असूनही ते निमूटपणे सहन करते. आपल्या पतीबरोबर संबंध ठेवणाऱ्या सुमतीबद्दल तिच्या मनामध्ये राग आहे.
तो राग मनामध्ये तसाच दडपून टाकते व घरी आलेल्या सुमतीबरोबर चांगले संबंध ठेवते.

भावी कुटुंबातील समजूतदार व्यक्ती आहे. निवेदक व आपला नवरा यांच्या भांडणात ती मध्यस्थी करते. गावातील संघर्षात निवेदकाला गावात खलबता चालू आहेत असे सांगून मध्यस्थी करण्याचा सल्ला देते.

भावी श्रध्दाळू आहे. परंपरेने आलेली वहिवाट मोडू नये म्हणून सर्वांच्या विरुध्द जाऊन संघर्षमय वातावरणात देवीकडून ओटी भरून घेण्यात यशस्वी होते. त्या दंग्यात इतर स्त्रियांबरोबर ती देखील सापडते.

निवेदक तिला सुमतीच्या घरी आणायला जातो. त्यावेळी तिला हुंदका येतो आणि डोळ्यातून पाणी येते. इतके होऊनदेखील घराजवळ आल्यावर निवेदकाला घरातील व्यक्तींना काही एक न सांगण्याचा सल्ला देते.

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

एक स्त्री या नात्याने स्वत:च्या जमातीकडून नागविले गेल्यामुळे तिच्या मनामध्ये अपमान धुमसत असतो. घरामध्ये व निवेदकाबरोबर पहिल्यासारखी वागत नाही. निवेदक न बोलण्याचे कारण विचारतो त्यावेळी मनामध्ये दडपून राहिलेल्या भावना जाग्या होतात. ती म्हणते, "का माझ्यावर ऐसो परसंग येवो ? माझ्या इज्जतीत मी -हेत होत. दुसरी कसलीच तमा नव्हती. मला तीच का लुटतेन ? आता माझ्याशी -हेलाच काय ? आनी तुमीबी काय केलाव ? काय केलाव ?"[1] असे रागाने म्हणते, नंतर राग शांत झाल्यावर निवेदकाजवळ चुकीबद्दल खंत व्यक्त करते.

भाबी सुमतीपासून पतीला अलग करू शकत नाही. सुमतीला आपल्या घरापासून दूर ठेवू शकत नाही. मात्र सर्वांच्या विरूद्ध जाऊन देवीची ओटी भरण्यात यशस्वी होते.

भाबीच्या अंत:करणात नव-याने टेकसांडल्याचे दु:ख आहे. सुमतीबद्दल राग आणि अंतर्मुख स्वाभिमान आहे. दिराबद्दल भावविवशतेचा स्पर्श न झालेले निरागस प्रेम आहे.

भीबीच्या स्वभावातील हे वेगवेगळे पैलू लेखकाने आपल्या लेखणीच्या सामर्थ्याने वेधक शब्दात रेखाटले आहे. त्यामुळे भाबी हे व्यक्तिचित्रण मराठी कादंबरीतील एक उत्तम व्यक्तिचित्र ठरले आहे.

४) <u>जीवनातील सर्वस्व गमावून बसलेली सुमती:</u>

"इंधन" या कादंबरीतील अनेक गटांना व अनेक व्यक्तींना जोडणारी निवेदकाच्या भावामुळे जीवनातील सर्वस्व गमावून बसलेली व्यक्ती सुमती होय.

निवेदक गावी आल्यानंतर इतर समाजातील याच व्यक्तीशी त्याचे पहिल्यांदा दृढ संबंध प्रस्थापित होतात. निवेदक ब-याच वर्षांनी गावी

आल्याबद्दल अरे तुरे च्या भाषेत ती त्याची हजेरी घेते. त्याच्या घरचा चहा पिते. मांसमासे खाणा-या ब्राम्हणाच्या मुलीच्या पहिल्याच झालेल्या दर्शनाने निवेदक प्रभावित होतो. निवेदकाला भाबीकडून सुमती-भाऊ संबंधाची माहिती मिळते.

निवेदक आणि सुमती यांची यानंतरची भेट महत्त्वाची आहे. निवेदकाला तिच्या घरी जाण्याचा योग येतो. या भेटीत सुमतीचे एकाकीपण, तिचे दु:ख निवेदकाला समजते. या भेटीत निवेदक ब्राम्हणाच्या घरात प्रथम प्रवेश करतो. ओस पडलेल्या ब्राम्हणवाडीतील एका घरात मधोमध भिंत घालून एका बाजूला ती व दुस-या बाजूला तिचा चुलत भाऊ राहतो. या भेटीत भावाबरोबरच्या संबंधाचा निवेदक विषय काढताच माझे संबंध चांगले आहेत असे सांगून एकदम गंभीर होते. तिच्या डोळ्यातून पाणी येते. यावरून निवेदकाला भावाशी असलेल्या संबंधाबद्दलची स्वच्छ भूमिकाही कळून येते.

निवेदक आणि सुमतीच्या पुढील भेटीतून भाऊ-सुमती संबंध अधिक स्पष्ट होतो. यावेळी भावाने विद्यार्थीदशेत असताना आपल्यावर केलेला बलात्कार निवेदकाला सांगते. निवेदकावर त्याचा चांगलाच परिणाम होतो. भावाच्या अन्यायामुळे जीवनातील सर्वस्व गमावून बसलेली व तेव्हापासून त्याशी दीन बनून राहिलेल्या सुमतीबद्दल सहानुभूतीची लाट निर्माण होते.

निवेदक सुमतीच्या घरी जाण्याचे टाळू लागतो. चौथ्या भेटीमध्ये निवेदक ब-याच वर्षांनी आले आहे विनाकारण कॉम्प्लिकेशन्स नको असे जेव्हा म्हणतो तेव्हा ती उसळून "त्यात कसल्या कॉम्प्लिकेशन्स आल्या आहेत ? तुझ्या भाबीला सांग, तिच्या दिराबरोबरही संबंध ठेवण्याइतका माझा अध:पात झालेला नाही. नव-याबरोबरचे संबंध तोडण्यासाठी तर मी धडपडते आहे. मला त्यातून सुटका करून घ्यायची आहे." [१०] असे म्हणून तुझ्या येण्याने माझ्या मनाला बरे वाटते असे सांगते. यातून तिचे अंतर्मनातील सूक्ष्म व

काहीसे अबोध असे प्रयोजन स्पष्ट होते. तिच्या व प्रामाणिक स्वभावाची कल्पना येते.

निवेदकाबरोबरच्या पाचव्या भेटीमध्ये सुमती निवेदकाच्या मर्मावरच बोट ठेवते. पंधरा वर्षांपूर्वी गावाचा संबंध तोडलास त्याचवेळी लोकांना उपदेश करण्याचा हक्क गमावलास. असे सांगून सामाजिक पातळीवरील नायकाच्या वांझोटया अस्तित्वाची जाणीव करून देते. अशी भांडणे होतात ती आपोआपच मिटतात असे दंग्याविषयीचे अचूक निदान करते.

गावातील संभाव्य दंग्याच्या अफवा ऐकून ती निवेदकाजवळ भीती बोलून दाखवते. मुसलमानाशी अनैतिक संबंध ठेवून असलेली एकाकी स्त्री म्हणून तिच्या मनामध्ये भीती निर्माण झाली आहे. तिला आपल्या प्रियकराबद्दल विश्वास वाटत नाही. या दंग्यामुळे जो विनाश होणार आहे त्यातून कुणीही सुटणार नाही याचे अटळपण तिच्या लक्षात आले आहे. म्हणून तो अधिक गंभीर बनते.

गावातील पालखीच्या मिरवणुकीच्या वेळी झालेल्या दंग्यामध्ये सापडलेल्या प्रियकराच्या पत्नीला घरी घेऊन जाते. तिला संरक्षण देते आणि तिचा दीर आल्यावर त्याच्या स्वाधीन करते. या वागण्यातून सुमतीच्या स्वभावातील एका वेगळ्या पैलूचे दर्शन घडते.

गावातील साऱ्या घटनेने खिन्न होऊन सुमती शेवटी मुंबईला निघून जाते.

समाजामध्ये अनेक स्त्रिया अशा असतात की ज्या आपली काही चूक नसतानाही सामाजिक बळी ठरतात. आणि आपल्या जीवनातील सर्वस्व गमावून बसतात. अशा स्त्रियांचे सुमती प्रतिनिधित्व करते.

लेखकाने सुमतीच्या व्यक्तिचित्रणातून आपल्या समाजातील सामाजिक समस्या वास्तव स्वरूपात मांडलेली आहे. निवेदकाच्या आगमनानंतर विकास होत जाणारी सुमतीची व्यक्तिरेखा कादंबरी वाचताना वाचकांना अस्वस्थ करून ठेवते. यातच लेखकाचे यश सामावलेले आहे.

५) खोल परंपरेचा व धर्माचा पगडा असलेला इसाक:

माणसामध्ये संमजसपणे वागणाऱ्या व्यक्ती असतात. त्याचप्रमाणे दुराग्रहीपणे वागणाऱ्याही व्यक्ती असतात. दळवाईंना मनुष्यस्वभावाच्या या विविधतेची यथायोग्य जाण आहे.

"इंधन" या कादंबरीतील गावातील संघर्षाला जबाबदार ठरलेली व दुसऱ्या कोणाचे न ऐकता स्वतःच्या मनाप्रमाणे वागणारी हट्टी व्यक्तिरेखा म्हणजे इसाक होय.

कादंबरीमध्ये चौथ्या प्रकरणापासून इसाक वावरतो. तेथून पुढे कादंबरीतील सर्व घटनेचा केंद्रबिंदू बनून राहतो.

नुकताच आफ्रिकेहून आलेला इसाक निवेदकाच्या घरी येतो. निवेदक आणि इसाक यांच्या पहिल्या भेटीतच इसाकच्या स्वभावाची आपणाला कल्पना येते. निवेदकाचे वागणे इसाकला पटत नाही. निवेदक जुम्म्याच्या नमाजाला आला नाही याचा त्याला राग येतो. निवेदकामुळे पंधरावर्षापूर्वी आपणाला कुळवाडी-मुसलमान संघर्षात जमिनी गमवाव्या लागल्या हे तो अजूनही विसरला नव्हता.

बेफिकीरपणे वागणारा इसाक समाजाचे कोणतेही दडपण न घेता लक्ष्मीशी संबंध ठेवतो. निवेदक गावातील बौद्धिनीशी कशाला संबंध ठेवतोच असे म्हणताच, "अरे गावातल्या पोरी आता हुशार झाल्या हैत।

त्यो माझी केपटाऊनवालो म्हणून टिंगल करतात. बोलताव मला अक्कलच नाय. मी तुम्या पैशानचो माणूस हाय. तुम्या पैशानचे कपडे घालता. तुम्या इशारानी वागता. याला काय करायचा ? आणि आपल्याला तर बाईबिगर चैनच पडत नाय, त्याला काय करनार ?" [११] अशी आपल्या मनाची व्यथा प्रामाणिकपणे सांगतो.

इसाक आफ्रिकी श्रीमंतीने माजलेला आहे. खोत परंपरेचा आणि धर्माचा जबरदस्त पगडा त्यांच्यावर आहे. म्हणून तर लक्ष्मीला घरातून नेली याच्या पेक्षा इतर जातीतील लोक आपल्या घरामध्ये शिरले याचे शल्य त्याच्या मनामध्ये बोचत राहते. त्यामुळे चिढून इतर जातीतील लोकांना कामावरून कमी करण्याचा एकांगी वाईट असा निर्णय घेतो.

त्याला संघर्षामध्ये समझोत्याचा सल्ला पटत नाही. गावातील संघर्ष मिटावा म्हणून समझोत्याचा प्रयत्न निवेदकाचे वडील व हरबाराव करतात. त्यावर चिढून तो निवेदकाजवळ म्हणतो, "तुझ्या बाबालास तर काय समजत नाय. ज्यात त्यात तोंड घालतात । मी त्यांना सांगलां, फककचिच्या तुम्ही आता म्हातारे झालाव तुमला त्यात काय समजत नाय. तुम्ही बोलू नको पन ते ऐकतच नाय." [१२]

हमीद दलवाईनी इसाकच्या व्यक्तिचित्रणातून समाजातील एका वेगळ्या स्वभावाच्या व्यक्तीचे दर्शन घडविले आहे. इसाकच्या स्वभावातील वैगुण्याचे मार्मिकपणे चित्रण केल्यामुळे ही व्यक्तिरेखा स्वाभाविक वाटते.

ब) <u>समजूतदार व्यक्तिरेखा:</u>

समाजातील काही व्यक्ती समजूतदार असतात. त्यांच्या स्वभावामध्ये अतिरेकपणा नसतो. ऐकावे जनाचे करावे मनाचे या म्हणीप्रमाणे त्या

वागतात. या व्यक्ती कोणतेही संकट निर्माण करीत नाहीत. तर आलेले संकट सोडविण्याचा प्रयत्न [redacted]. [redacted] अशा व्यक्तींची गरज असते. अशा समजुतदार स्वभावाच्या काही व्यक्तिरेखा हमीद दलवाईंच्या कथात्मक साहित्यात आढळतात.

"इंधन" या कादंबरीतील समजूतदार, प्रतिष्ठित व आपल्या स्वभावाची छाप गावावर पाडलेली व्यक्ती म्हणजे निवेदकाचे वडील होय.

निवेदक गावी येतो. त्यावेळी काळोखात पडवीतल्या आराम खुर्चीवर बसलेल्या वडिलांचे दर्शन पहिल्यांदा होते. अंधारात त्यांना आपल्या मुलाला नीटपणे ओळखता येत नाही. निवेदकाच्या तोंडातून निघालेल्या आवाजावरून ते आपल्या मुलाला ओळखतात. मुलाला ओळखल्यानंतर त्यांच्या डोळ्यांतून पाणी येते. निवेदकाबद्दल त्यांच्याजवळ ममत्व आहे. निवेदकाच्या भावना समजून घेण्याइतका समंजसपणा आहे. पंधरा वर्षे घरची जबाबदारी टाकून गेलेल्या मुलाविषयी कुठल्याही प्रकारची कटुता न बाळगता त्याच्या प्रकृतीची आस्थेने चौकशी करून विश्रांतीचा सल्ला देतात.

कुटुंबातील वडीलधारी व्यक्ती म्हणून त्यांना महत्व आहे. त्याचबरोबर मुस्लिम समाजातील अनुभवी व अधिकारी व्यक्ती म्हणून समाजात मान आहे. गावात कोणताही संघर्ष निर्माण झाल्यास किंवा कोणतीही समस्या निर्माण झाल्यास गावातील दोन्ही जमातीतील लोक वडीलांचा सल्ला घेतात.

निवेदकाच्या वडिलांच्या जवळ व्यवहारी दूरदृष्टी आहे. पंधरा वर्षांपूर्वी निवेदकाने कुळवाड्यांना मुसलमानाविरुद्ध सल्ला दिलेला असतानाही ते एका शब्दाने मुलाला काहीही विचारीत नाहीत. मुलाच्या या वागण्याबद्दल मुसलमानांनी धारेवर धरूनही ते काही बोलत नाहीत.

निवेदकाचे वडील समजूतदार होते. गावात सर्वांनी मिळूनमिसळून वागावे. गावात कसलाही तंटा नसावा, असे त्याचे प्रामाणिक मत होते. इसाक-लक्ष्मी प्रकरणात ते इसाकला लक्ष्मीला परत पाठविण्यास सांगतात. भांडण मिटविताना पाठीमागील काढून परिस्थिती चिघळू नये म्हणून समझोत्याच्या बैठकीत पाठीमागील काही काढू नका असे सर्वांना सांगतात.

आज समजूतदार असणाऱ्या बाबांच्याकडे कडवी धर्मनिष्ठा होती. पण ती व्यक्तिगत स्वरूपाची होती. कोणताही विषय स्वत:च्या किंवा जमातीच्या अस्मितेचा बनवून गावात त्यांनी कधी तंटे वाढविले नाहीत. तारुण्यात त्यांना जीनासाहेबांचे विचार पटतात. धार्मिक बाबतीतील त्यांचा कडवेपणा इन्स्पेक्टर मशिदीची झडती घेताना समजून येतो. इन्स्पेक्टर मशिदीमध्ये जाताना पायातील जोडे काढायला ठणकावून सांगतात. आज मात्र त्यांच्या धर्मनिष्ठेची धार वयोमानानुसार कमी झालेली आहे. म्हणून तर हिंदूनी मशिदीवरून मिरवणूक वाजवीत नेण्याच्या निर्णयावर जमाना बदललेला आहे अशी प्रतिक्रिया व्यक्त करतात.

बऱ्याच दिवसानंतर आलेला आपला मुलगा काही दिवसाच्या वास्तव्या-नंतर परत जायला निघतो त्यावेळी ते अस्वस्थ होतात. निवेदक जाण्याच्या दिवशी पहाटेच उठून बसतात. निरोप घ्यायला आलेल्या मुलाला घालविण्या-साठी ओटीबाहेर येतात. मुलाला तब्येत सांभाळून पत्र पाठविण्यास सांगतात.

"इंधन" या कादंबरीत <u>हरबाराव</u> ही गावातील आणखी एक समजूतदार व्यक्ती, हरबाराव गावातील भांडण मिटावे म्हणून निवेदकाच्या मार्फत प्रयत्न करतो.

"इंधन" या कादंबरीप्रमाणे दलवाईंच्या काही कथांतूनही गावातील समंजस व्यक्तींचे चित्र रेखाटले आहे.

"पराभूत" या कथेमध्ये आपल्या नव-यावर विश्वास ठेवणारी समजूतदार स्त्री आहे. नव-याने येथून पाठीमागे अनेक स्त्रियाबरोबर लग्न करून त्यांना तलाक दिलेला असतो. ही नव-याची कारस्थाने मुस्तकाखानने जीव तोडून सांगितली तरी त्याचा आपल्या मनावर कोणताही परिणाम न करता आपल्या नव-यावर विश्वास ठेवून त्याच्याबरोबर सुखाचे संसार करते.

"खुदा हाफिज" या कथेतील उबेदुल्ला आणि बानो यांनी एकेकाळी वैभवात दिवस घालवलेले असतात. परिस्थिती बदलल्यामुळे पूर्वीचे वैभव संपुष्टात येते. तरीदेखील खुदावर भरोसा ठेवून आपल्या वाटयाला आलेली परिस्थिती निमूटपणे स्वीकारतात.

थोडक्यात,"इंधन" मधील लेखकाचे वडील समजूतदार, संयमी, प्रेमळ, क्षमाशील आणि व्यवहारी दूरदृष्टी असणारे आहेत. लेखकाने हे गुण मोठया कलात्मकतेने वडिलांच्या व्यक्तिरेखेत भरलेले आहेत. वडिलांच्या व्यक्ति-रेखेबरोबरच जनार्दन "पराभूत" मधील स्त्री, "खुदा हाफिज" मधील उबेदुल्ला आणि बानो या व्यक्तिरेखाच्या जवळ असणारा समजूतदारपणा वेगवेगळया पध्दतीने टिपलेला आहे. गावरहाटीला स्थैर्य देणा-या काही व्यक्ती गावात असतात. अशा व्यक्तींचे आकलन दळवाई या व्यक्तिरेखा रेखाटून योग्य प्रकारे दाखवितात.

७) <u>दारिद्र्यात जीवन जगणा-या व्यक्तिरेखा:</u>

आर्थिक विषमतेमुळे समाजातील काही व्यक्ती श्रीमंत असतात तर काही दारिद्र्यात जीवन जगतात. दारिद्र्यात जीवन जगणा-या व्यक्तींना केवळ दारिद्र्यामुळे अनेकाकडून मानहानी करून घ्यावी लागते. पोट भरण्यासाठी नको ते व्यवसाय अशा व्यक्ती करतात.

हमीद दलवाईंच्या कथात्मक साहित्यात अशा व्यक्ती आहेत.

"इंधन" या कादंबरीतील इतर समाज हा मुसलमान खोतांच्यावर अवलंबून आहे. लख्या म्हाराला आपली मुलगी इसाकची संबंध ठेवून आहे हे माहित असूनही परिस्थितीमुळे त्याला गप्प बसावे लागते.

लक्ष्मीचा नवरा काशा याचे दारिद्र्य तर भयानक आहे. लक्ष्मीला इसाककडून सोडवून घेण्यासाठी इसाकला द्यावे लागणारे शंभर रुपये महिनाभर शोधावे लागतात.

"इंधन" कादंबरीबरोबरच दलवाईंच्या कथांमध्येही दारिद्र्याचे प्रभावी चित्रण येते.

"कफनचोर" या कथेतील रसूल हा मुसलमान तरुण दारिद्र्याने कमजोर झालेला आहे. तो आपले जीवनचरित्र चालावे म्हणून कबरस्तानातील मृतदेहाच्या अंगावरील कफन चोरून ते मारवाड्याला विकतो. दारिद्र्यामुळे कबरस्तानातील कफन चोरण्याची पाळी रसूलवर आलेली आहे.

रात्री कबरस्तानातील सुंदर तरुणीच्या मृतदेहाच्या शरीरस्पर्शाने रसूलच्या भावना जागृत होतात. पहाटेची चाहूल लागताच परिस्थितीची जाणीव होऊन रसूल भानावर येतो व घाईघाईने कफन ओढू लागतो.

"बेकार (पण कलावंत) माणसाची गोष्ट" या कथेत हमीद बेकार पण कलावंत तरुण असतो. त्याला कथा लिहिण्याची आवड असते. त्या साहित्यावर त्याला काहीही आर्थिक मदत होत नाही. हमीदची उपेक्षा ही आजच्या तरुण साहित्यिकाची असते.

हमीदला नोकरीची गरज असते. त्याच्या दैनंदिनीमध्ये सकाळी उठून एम्प्लॉयमेंट एक्स्चेंजमध्ये जाणे, तेथे नोकरीची चौकशी करणे, नोकरी मिळेल

ज्ञा आशेने प्रतिष्ठित शेटजींच्या घरी जाणे. तेथे नोकरी सोडून वेगळ्या विषयावरची चर्चा होणे. त्यांच्याकडून मानहानी करून संध्याकाळी घरी येणे हे चाललेले असते.

हमीदला अशा परिस्थितीत मेघा, अहमद या मित्राकडून आर्थिक मदत होते. त्यांच्या जीवावर भेळभजी खात हा दिवस काढीत असतो.

याच कथेतील मेघा ही देखील दारिद्र्यामुळे बेजार झालेली तरुणी आहे. तिच्यात आणि हमीदच्यात फरक इतकाच की हमीदला नोकरी नसते आणि मेघाला नोकरी असूनही हात धुवून पाठी लागलेली गरिबी सुटू शकत नाही.

मेघाला महिन्यातील पगारातून दरिद्री बापाला पैसे पाठवावे लागतात. हमीदला महिन्याला पाच रुपये देते. शेवटी खर्च भागत नाही म्हणून कॉलेज सोडण्याचा निर्णय घेते.

"पराभूत" या कथेतील मुस्तफाखानचे वडील गावातील श्रीमंत व्यक्ती मसूदखानकडे चाकरी करीत असे. आपल्या मुलाने खोताच्या मुलासारखे शिकावे अशी त्याची इच्छा असते. पण कमरुद्दीन मसूदखानकडे नोकरी करीत असताना मरण पावतो. वडिलाच्या मृत्यूनंतर घरची आर्थिक परिस्थिती चांगली नसल्यामुळे मुस्तफाखानला शाळा सोडून घरी बसावे लागते.

थोडक्यात, हमीद दलवाईंच्या कथात्मक साहित्यातील दारिद्र्यात जीवन जगणाऱ्या या व्यक्तिरेखा विविध तऱ्हेच्या आहेत. लक्ष्याला आपल्या मुलीचा व्यभिचार परिस्थितीमुळे सहन करावा लागतो. काशयाला स्वतःची हक्काची बायको मिळविण्यासाठी इसाकच्या पाया पडावे लागते. काशयाला आपली बायको इसाकची संबंध ठेवून आहे. याची जाणीव आहे पण परिस्थितीमुळे काही करता येत नाही. रसूलला कफनाची चोरी करण्यास भाग पडते.

अशा या व्यक्तिरेखा निमूटपणे आपल्या वाटयाला आलेले जीवन जगतात. त्यांच्या स्वभावामध्ये आक्रस्ताळपणा नाही. दारिद्र्याने त्यांचा स्वाभिमान हिरावून नेलेला आहे. दलवाईंनी आपल्या कथात्मक साहित्यातून कोकणासारख्या प्रदेशातील दारिद्र्याचे संयतपणे परंतु प्रभावी चित्रण केले आहे.

८) परिस्थितीमुळे स्वैरपणे जीवन जगणाऱ्या स्त्रिया:

समाजातील काही स्त्रियांना परिस्थितीमुळे स्वैरपणे जीवन जगावे लागते. या स्त्रिया इतर स्त्रियांपेक्षा वेगळ्या प्रकारचे जीवन जगतात. समाजातील नैतिकतेची सर्व बंधने त्या झुगारून देतात. समाज काय म्हणेल याचा विचार त्या करीत नाहीत. या स्त्रियांच्या वाटयाला दुःख आलेले असते. पण परिस्थितीने कठोर बनविल्यामुळे आपल्या वाटयाला आलेल्या दुःखाचा त्या कधी विचार करीत नाहीत. समाज अशा स्त्रियांच्याकडे एका वेगळ्या दृष्टीने बघतो. सर्वांच्या त्या चर्चेचा विषय झालेल्या असतात.

अशा काही स्त्रियांच्या व्यक्तिरेखा हमीद दलवाईंच्या कथात्मक साहित्यात आढळतात.

"इंधन" या कादंबरीतील परटीण आपला वडिलापासून आलेला कपडे धुण्याचा पिढीजात धंदा करते. परिस्थितीमुळे तिचे लग्न झाले नव्हते आणि त्याची खंतही तिला नव्हती. ती गावातील बऱ्याच मुसलमान खोतांबरोबर संबंध ठेवून होती. तिच्याकडे जाणाऱ्याला ती नाराज करायची नाही. कोणत्याही पुरुषाबरोबर ती भावनेने उचंबळून जात नसे आणि अनिच्छाही दाखवित नसे. निवेदक म्हणतो, "आयुष्य एकाएकी अनेक वर्षांनी आक्सून जावे तसे तिच्या बाबतीत जणू घडले होते. चेहरा विलक्षण भावनाशून्य बनला होता. लक्षपूर्वक न्याहाळूनही तिचे सुख किंवा दुःख समजू शकत नव्हते"[१३]

असे इतर स्त्रियापेक्षा वेगळे जीवन जगणारी परटीण आपल्या एकांगी आयुष्यामुळे व लग्न न झाल्यामुळे जीवनात स्वैरता ओढून बसली होती.

"इंधन" या कादंबरीतील लल्या म्हाराची लक्ष्मीला आपल्या नव-याबद्दल भावनिक आसक्ती नव्हती. आणि तशा प्रकारची आसक्ती इसाकबद्दलही नव्हती. पण आपला नवरा काश्या अत्यंत गरीब आहे. त्याच्यापेक्षा इसाक-बरोबर संबंध ठेवल्यामुळे चार घास चांगले मिळतात म्हणून इसाकबरोबर संबंध ठेवते.

"आम्हा चौघांची बाई" या कथेतील काळी गरीब परिस्थितीवर उपाय म्हणून अनेक पुरुषाबरोबर संबंध ठेवते. तिचे शिवा, हमीद, अहमद आणि रायबान हे चार मित्र असतात. हे मित्र तिचा सर्व भागवतात. केवळ जीवन जगण्यासाठी ही स्त्री शरीर विक्रय करते.

"कळ" या कथेतील तरुणी दरिद्री बापाची मुलगी असते. ती मुक्तपणे अनेक पुरुषाबरोबर संबंध ठेवते.

या सर्व स्त्रिया परिस्थितीमुळे या मार्गाला लागलेल्या आहेत. त्या साध्या स्वभावाच्या प्रामाणिक आहेत. म्हणून तर"कळ" या कथेतील तरुणी आपल्या नव-याला आपली वाईट कृत्य सांगून टाकते. आपण या मार्गाला लागलो याची खंतही त्यांच्या मनामध्ये नाही. आपल्या वाटयाला जे जीवन आले आहे त्याचा त्या विचार करीत नाहीत. नियतीमुळे पदरात पडलेले हे जीवन समाजाची कोणत्याही प्रकारची पर्वा न करता सरळपणे जगतात.

१) परंपरेचे जीवन जगणा-या श्रध्दाळू व्यक्तिरेखा:

हमीद दलवाईंच्या कथात्मक साहित्यात परंपरेने आलेले जीवन जगणा-या श्रध्दाळू व्यक्तिरेखा आहेत. या सर्व व्यक्तिरेखा अशिक्षित असून परंपरेचा पगडा त्यांच्यावर किती मोठ्या प्रमाणात आहे याचे चित्रण त्यांनी केले आहे.

"इंधन" या कादंबरीतील जनार्दन न्हावीगावात सलूनचे दुकान घालून आपला उदरनिर्वाह करतो. अलिकडे गावातील व्यक्ती बाजारातील सलूनकडे जातात. त्यामुळे त्याचा पूर्वीसारखा धंदा चालत नाही. तरी देखील समाजातील प्रतिष्ठेसाठी तो दुकान बंद करीत नाही. पुलामुळे खेडी व शहरे जवळ आली. तरी खेडी भिकेला लागली असे त्याचे प्रामाणिक मत असते.

आपला धंदा चालत नाही. गावातील इतर न्हावी लोकांशी पटत नाही तरी देखील गाव सोडून मुंबईला जायला त्याच्या जीवावर येते. गावातील संघर्ष मिटावा असे त्याचे प्रमाणिक मत असते. गावातील हिंदू-मुस्लिम संघर्षा-नंतर अस्वस्थ होणारा जनार्दन निवेदकाबरोबर गावाला कंटाळून मुंबईला निघून जातो. व्यवसायाबद्दलची जी पारंपरिक मनोवृत्ती असते तिचे चित्रण लेखकाने जनार्दन या व्यक्तिरेखेच्याद्वारा केले आहे.

"इंधन" या कादंबरीबरोबरच हमीद दलवाईंची कथातूनही परंपरेचे जीवन जगणा-या श्रध्दाळू व्यक्तिरेखा चित्रित केल्या आहेत.

"छप्पर" या कथेतील अशिक्षित कुटुंबातील अबासखान आणि त्याची पत्नी बानो क्षयासारखा रोग संसर्गजन्य आहे.हे मुलाने कितीही पटवून सांगितले तरी मायेमुळे आपल्या मुलीपासून दूर न राहता सर्व कुटुंब उध्वस्त होण्यास कारणीभूत ठरतात.

"तळपट" या कथेत अहमद व कासमखान या मुसलमान व्यक्ती हिंदू देवतेच्या शापथेवर विश्वास ठेवतात. अहमद खोताच्या उडवीला आग लावणारा संशयित आरोपी अण्णा महालक्ष्मीची शपथ दिल्यामुळे मरण पावला अशी मनामध्ये समजूत बाळगतात.

"शेरणं" या कथेतील हसनखान दहा वर्षे झाली तरी मुल होत नाही म्हणून बायकोला निरनिराळ्या झाडपाल्याची औषधे देतो. वैदू लोकांचे गंडे-दोरे गळ्यात बांधतो. इतके करूनही मुल होत नाही म्हणून अस्वस्थ होऊन हसनखान "स्वत:च्या आणि बायकोच्या कर्माला बोल लावू लागला. चार चौघात उठ-बस करणं तो टाळू लागला. निरमुसला होऊन सखी-अपमाळ घेऊन पडवीतल्या फलाटीवर गमभीन होऊन बसू लागला."[१४] त्याची ही अवस्था बघून रहीमखान मुल होण्यासाठी महालक्ष्मीला शेरणं घालण्यास सांगतो.

त्याच्या सांगण्यावरून तो महालक्ष्मीला शेरणं घालतो. शेरणं नियताच देवीच्या नावाने बोकड सोडून मुल झाल्यावर देवीला बोकड कापणार असल्याचे प्रत्येकाला सांगत बसतो.

थोडक्यात, हमीद दलवाईच्या कथात्मक साहित्यातील श्रध्दाळू व्यक्ति-रेखा जुन्या परंपरेला चिकटून आहेत. देववादी वृत्तीच्या या व्यक्ती जुन्या संकेतावर, परंपरेवर व श्रध्देवर विश्वास ठेवून आहेत. म्हणून तर जनार्दन गावातील प्रतिष्ठेसाठी दुकान बंद करीत नाही. गावावर असणाऱ्या मायेमुळे गाव सोडायचे त्याला धाडस होत नाही. "छप्पर" या कथेतील अब्बासखान व त्याची बायको आपल्या सुशिक्षित मुलाने कितीही सांगितले तरी समजावून घेत नाहीत. "तळपट" या कथेतील अहमद आणि कासमखान "शेरणं" या कथेतील हसनखान आणि रहीमखान देवीवर विश्वास ठेवतात.

हमीद दलवाईंच्या कथात्मक साहित्यातील विकास न होणा-या या व्यक्तिरेखा जिवंत व अकृत्रिम वाटतात.

१०) समाजातील विक्षिप्त व त-हेवाईक व्यक्तिरेखा:

समाजामध्ये वेगवेगळ्या स्वभावाच्या व्यक्ती असतात. काही समजूतदार असतात. काही श्रध्दाळू असतात. यापेक्षा वेगळा स्वभावधर्म असणा-या स्वत:च्या मर्जीनुसार वागणा-या विक्षिप्त व त-हेवाईक अशा व्यक्ती असतात.

हमीद दलवाईंच्या कथात्मक साहित्यात अशा स्वभावाच्या काही व्यक्तिरेखा आढळतात.

"इंधन" मधील वाणी व वाण्याची बायको वाणीण हे एक समाजातील नमुनेदार असे जोडपे आहे.

वाणिणीचा शहरात जीव लागत नाही. म्हणून बायकोच्या मर्जीखातर तो खेडेगावात येतो. तिथे आज रोख उद्या उधारचा बोर्ड लावून दुकान चालू करतो.

वाण्याला आपली देखणी बायको गि-हाईकासमोर आलेली आवडत नसे. वाणिणीला शेजारच्या जनार्दन न्हाव्याबद्दल एकाच वेळी आकर्षण आणि अविश्वास वाटतो.

एकमेकाबद्दल लोभ असणारे हे जोडपे विक्षिप्त व त-हेवाईक वाटते.
हमीद दलवाईंच्या कथांतूनही विक्षिप्त व त-हेवाईक व्यक्तीचे चित्रण आलेले आहे.
"महफिल" या कथेतील गावातील खडानखडा बातमी माहिती असणारा दिलावर संध्याकाळी फिरायला गेल्यानंतर अशा बातम्या सांगून लोकांचे मनोरंजन करतो. दिलावर आपल्या मुंबईतील दोन भावांच्या जीवावर ऐशआरामात जीवन जगतो.

दिलावरचे गावातील खतीजा नावाच्या मुलीबरोबर संबंध असतात. या संबंधातून खतीजा गरोदर राहते. दिलावर एक वेगळीच कृप्ती शोधून आपल्या मित्रांच्या मदतीने मूल पाडण्यात यशस्वी होतो. विशेष म्हणजे त्यासाठी आलेला खर्च तो सर्व टोळक्यावर बसवतो.

जेव्हा सर्व गावाला दिलावरचे व खतीजाचे संबंध समजतात. तेव्हा त्याचे इतर मित्र तुझी अब्रु गेली असे म्हणतात. त्यावेळी तो "ती जाऊ दे रे । या गावात साला अब्रुदार आलेच कोण ? त्याला मी रडत नाही. लोक येत ना आपल नाव ? आपले काय जाते ?" [१५] अशी बिनधास्तपणे आपली प्रतिक्रिया व्यक्त करतो.

"माणूस आणि गाढव" या कथेतील पैसा पैसा म्हणून पैशाच्या पाठी-मागे लागलेला लोकाना लावलेल्या रकमेचे व्याज खात बसलेला अबदुल्ला, पैसा मिळविण्यासाठी निरनिराळे आडाखे आखतो.

घरचा एक सारखा खर्च वाढत होता. मूळ रक्कम मात्र तशी वाढत नव्हती. वर्षाला पाचशे रुपये तूट येत होती. ही त्याची चिंतेची बाब होती. मुंबईतील फक्रूच्या मुलाला पत्र पाठवून हॉटेल काढण्याची कल्पना सांगतो. पण यासाठी दोन महिने जाणार होते. हे वर्ष रिकामे गेल्यामुळे वीस हजार रुपयाचे साडे एकोणीस हजार व्हायला वेळ लागणार नव्हता म्हणून तोपर्यंत वांग्याचा मळा लावतो.

मळ्यातील वांगी बाजारात विकून पैसा मिळवितो. वांग्याचा भाव खाली येताच त्याला तोटा सहन करावा लागतो. त्यावेळी मळ्यातील गाढव पकडून वहाराकडून प्रत्येक गाढवापाठीमागे दोन रुपये वसूल करतो.

"पराभूत" या कथेतील श्रीमंत गृहस्थ मखदखान अनेक स्त्रियाबरोबर लग्न करतो. वर्षभर संसार केल्यानंतर या ना त्या कारणाने प्रत्येकीला तो घटस्फोट

देतो. नंतर मात्र तो एका स्त्री बरोबर लग्न करतो आणि तिच्याबरोबर सुखाने संसार करतो.

हमीद दलवाईंच्या कथात्मक साहित्यात ज्या विक्षिप्त व त-हेवाईक व्यक्ती आहेत, तशा स्वभावाच्या व्यक्तिरेखा आपणाला समाजात आढळतात. विशेष-करून या स्वभावाच्या व्यक्तिरेखा अशिक्षित ग्रामीण समाजात जास्त आढळून येतात. त्या आपल्या लहरी स्वभावानुसार वागतात. त्यांच्या या विचित्र वागण्यामुळे समाजातील सर्व व्यक्तींच्या त्या जास्त परिचयाच्या होतात.

सारांश -

हमीद दलवाईंनी व्यक्तिचित्रणामध्ये जिवंतपणा आणण्यासाठी त्यांच्या स्वभावातील विविध भावछटा, आपआपसातील संबंध साहित्यातून व्यक्त केले आहेत. व्यक्तींच्या स्वभावातील गुणाबरोबरच दुर्गुणही दाखवलेले आहेत.

दलवाईंनी व्यक्तीच्या बाह्य चित्रणाबरोबरच मानवी मनामध्ये परस्पर अशी जी मानसिक आंदोलने उठतात ती टिपलेली आहेत. इसाक निवेदकाला बाईशिवाय मला चैनच पडत नाही, असे सांगतो. त्यावेळी लेखक तेथे इसाकचे मन उघडे करतो. "कफनचोर" या कथेतील कबरस्तानातील तरुणीच्या मृतदेहाच्या शरीरस्पर्शाने तरुण रसूलची जागृत झालेली भावना स्वाभाविक आहे.

अशा काही मानसिक क्रिया-प्रतिक्रिया त्यांनी मानवी पातळीवर चित्रित केल्या आहेत.

हमीद दलवाईंच्या कथात्मक साहित्यातील व्यक्तींमध्ये विविधता आहे. हिंदू व मुसलमान समाजातील विविध स्वभावाच्या व्यक्ती त्यांच्या कथात्मक साहित्यात आलेल्या आहेत.

त्यांच्या कथात्मक साहित्यात समजूतदार, हट्टी, श्रद्धाळू, विक्षिप्त अशा विविध स्वभावाच्या व्यक्ती आढळतात. यातील काही व्यक्ती श्रीमंतीने माजलेल्या आहेत. तर काही दारिद्र्याने ग्रासलेल्या आहेत. विविध स्वभावाच्या व्यक्तिचित्रणामुळे त्यांच्या कथात्मक साहित्यातील व्यक्तिरेखा-मध्ये एकसूरीपणा न येता विविधता आली आहे.

हमीद दलवाईंची सर्व बाबतीत जशी सूक्ष्म निरीक्षण दृष्टी जाणवते. तशी व्यक्तिचित्रणातही जाणवते. त्यांनी व्यक्तीच्या स्वभावातील व शारीरातील बारकावे आपल्या सूक्ष्म निरीक्षण दृष्टीने टिपलेले आहेत.

हमीद दलवाईंनी या सर्व व्यक्ती वास्तवातून उचललेल्या आहेत. त्यांच्या कथात्मक साहित्यातील व्यक्तीसारख्या व्यक्ती आपणाला आसपासच्या समाजा-तही वावरताना दिसतात.

या सर्व विशेषामुळे दलवाईंच्या कथात्मक साहित्यातील व्यक्तिरेखांचे चित्रण जीवनदर्शन घडविण्याच्या दृष्टीने प्रभावी झाले आहे.

.........

## प्रकरण तिसरे

### संदर्भ ग्रंथ


१) दलवाई हमीद - "इंधन", मौज प्रकाशन, मुंबई, दुसरी आवृत्ती, सप्टेंबर, १९८१, पृ. ९.

२) तत्रैव, - तत्रैव, पृ. ११.

३) तत्रैव, - तत्रैव, पृ. ११५.

४) तत्रैव, - तत्रैव, पृ. १०३.

५) तत्रैव, - तत्रैव, पृ. ४२.

६) तत्रैव, - तत्रैव, पृ. ७, ८.

७) तत्रैव, - तत्रैव, पृ. ३९.

८) तत्रैव, - तत्रैव, पृ. ६.

९) तत्रैव, - तत्रैव, पृ. १३२ - १३४.

१०) तत्रैव, - तत्रैव, पृ. ६५.

११) तत्रैव, - तत्रैव, पृ. ८७.

१२) तत्रैव, - तत्रैव, पृ. ९३.

१३) तत्रैव, - तत्रैव, पृ. १९, २०.

१४) दलवाई हमीद - "शोरणं", लाट, मंजुल प्रकाशन, पुणे, दुसरी आवृत्ती, २८ सप्टेंबर, १९९०, पृ. ५९.

१५) दलवाई हमीद - "महफिल", लाट, मंजुल प्रकाशन, पुणे, दुसरी आवृत्ती, २८ सप्टेंबर, १९९०, पृ. ८५.

........